ePaper

## 'गडकरींमध्ये पंतप्रधानपदाच्या खुर्चीला न्याय देण्याची शक्ती': शहाजी बापू



वर्ष - 6 । अंक - 284 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- कसब्यात उमेदवारीवरून भाजपमध्येच चुरस
- जगताप कुटुंब 'अभेद्य'!
- शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघासाठी आज मतदान
- अंधार आणि नुसताच अंधार...


www.mahaenews.com | सोमवार, दि. 30 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# हजारो जत्रा पाहिल्या पण अशी नाही!

## इंद्रायणी थडी 2023 : समारोप समारंभात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेचा आ. महेश लांडगेंवर कौतुकाचा वर्षाव

। पिंपरी । महाईन्यूज । अमित शेळके ।

**भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार तथा भाजपचे शहराध्यक्ष महेश लांडगे आणि शिवांजली सखी मंचच्या अध्यक्षा पूजा महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून इंद्रायणी थडी 2023 या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

या कार्यक्रमाच्या समारोपासाठी राज्याचे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महेश लांडगे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. हजारो जत्रा पाहिल्या पण अशी जत्रा पाहिली नाही. महेश दादा काय पण करू शकतात, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं बालजत्रा आहे. ग्राम संस्कृती आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरा पुढे नेणारा हा उपक्रम आहे, असंही एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

इंद्रायणी थोडीच्या समारोपाला मी आलो आहे. महेश दादांनी मोठा व्यासपीठ उपलब्ध करून दिला आहे. श्रीराम मंदिराची भव्य प्रतिकृती उभारली आहे. इकडे भजन महोत्सव, खाद्य महोत्सव सर्व पदार्थांचा आस्वाद घेण्याची संधी मिळाली, असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी इंद्रायणी थडी महोत्सवाला शुभेच्छा दिल्या. मी जर आलो नसतो तर या महोत्सवाला मुकलो असतो. सन्मान नारी शक्तीचा, भारतीय संस्कृती या ठिकाणी पाहायला मिळाली आहे. वीस लाख लोकांनी हजेरी लावली हे कमी नाही. अनेक महिलांना रोजगाराची संधी दिली. अशा महोत्सवाचा आयोजन ही काळाची गरज आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. आमचे सरकार काम करणारे सरकार आहे. सर्वसामान्य जनतेचे काम करणार सरकार आहे. सर्वसामान्य जनतेला काम देण्याचे काम हे सरकार करत आहे.





### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेः 'वीस लाख लोकांना एकत्र आणण्याची जादू महेश दादांनी केली'

> "महेश लांडगे अपक्ष लढूनही जिंकले होते. महेश दादांनी माझी भेट घेतली होती. दाढीवाला पैलवान जिंकणार याची खात्री होती. ज्याला पारकच नाही तो काय करू शकतो, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला आहे. आता आपण एकच आहोत तुमच्यासाठी काम करणारा हा मुख्यमंत्री आहे. आपले सर्व आमदार काम करतात. वीस लाख लोकांना एकत्र आणण्याची जादू महेश दादांनी केली आहे. त्यामुळे मी त्यांचं अभिनंदन करतो. पिंपरी चिंचवडचा काया पालट आपल्याला करायचा आहे. या भव्य दिव्य महोत्सवातून अर्थव्यवस्थेची मोठी उलाढाल होत आहे. त्याला मी शुभेच्छा देतो.
>
> - एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

## ईडीच्या तपासात सहकार्य न करता पुरावे केले नष्ट, मूलचंदानींच्या भावांना व पुतण्याला अटक

। पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सेवा विकास बँकेचे माजी अध्यक्ष अमर मूलचंदानीची चौकशी करण्यासाठी ईडीचे अधिकारी आले, तेव्हा त्यांच्या तपासात अमर मूलचंदानीच्या दोन्ही भावाने आणि मुलाने सहकार्य केले नाही, उलट पुरावा नष्ट केला.**



तपासात अडथळे आणल्याचा ठपका ठेवत ,रात्री पिंपरी पोलिसांनी अमर मूलचंदानीच्या दोन्ही भावांना व पुतण्याला अटक केली आहे.

अशोक साधुराम मूलचंदानी (वय- 57वर्ष ), मनोहर साधुराम मूलचंदानी (वय- 61वर्ष) सागर मनोहर मूलचंदानी (वय- 26 वर्ष) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

तसेच आणखी दोन महिलांना नोटीस देऊन सोडण्यात आले. तर अमर मूलचंदानी हे ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले आहेत. रात्री उशीरा ईडीने चौकशी पूर्ण केल्यावर ही तक्रार दिली होती.

अमर मूलचंदानी सेवा विकास बँकेचे माजी अध्यक्ष आहेत. पिंपरी मधील मिस्ट्री पॅलेस या ठिकाणी ते राहतात. या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर त्यांचा फ्लॅट आहे. याच ठिकाणी ईडीने छापेमारी केली होती. मूलचंदानी यांच्यासह इतर संचालकांवर बनावट कागदपत्रांच्या आधारे 124 कर्जांचे वाटप केल्याचेआणि यातून 400 कोटींहून अधिकचा घोटाळा झाल्याचे समोर आले होते.

## सेवा विकास बँक घोटाळा: बँकेचे माजी अध्यक्ष अमर मूलचंदानी यांची चौकशी

### हजारो ठेवीदारांचा कोट्यावधीचा पैसा अडकून

» पिंपरी चिंचवड पोलिसांनी याप्रकरणी अमर मूलचंदानी यांच्यासह पाच जणांना अटकही केली होती. काही महिन्यांपूर्वी मूलचंदानी जामिनावर बाहेर आले आणि आज ईडीने छापा टाकला होता. आरबीआयने प्रशासक

# कसब्यात उमेदवारीवरून भाजपमध्येच चुरस!

## उमेदवार निश्चित करणे, हे भाजपच्या दृष्टीने जिकिरीचे

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कसबा विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करणे, हे भाजपच्या दृष्टीने जिकिरीचे झाले आहे. त्यामुळेच पाच नावांची शिफारस करण्यात आली आहे. पाचही उमेदवार तिकिटासाठी दावेदार असून, प्रत्येकाची जमेची तशीच उणी बाजूही आहे. त्यामुळे कोणाला उमेदवारी द्यायची, असे कोडे पक्षाला पडले आहे.**




### एका नावावर शिक्कामोर्तब होणार

भाजपकडून घेण्यात आली असून त्यासाठीच राजकीय समिती, संघटनात्मक समिती आणि व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे.दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे या मतदार संघात २६ फेब्रुवारी रोजी पोटनिवडणूक होत आहे. त्यासाठी इच्छुकांची संख्या जास्त असल्याने पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत भाजपची महाबैठक घेण्यात आली. त्यामध्ये पाच नावांची शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात मुक्ता टिळक यांचे पती शैलेश आणि चिरंजीव कुणाल यांचा नावाचा समावेश आहे. पुणे महापालिकेतील माजी सभागृह नेते गणेश बिडकर आणि धीरज घाटे; तसेच स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने यांचीही नावे त्या यादीत आहेत. या नावांची शिफारस करण्यात आली असली, या नावांवर राज्य पातळीवर चर्चा करण्यात आल्यावर तीन नावे केंद्रीय स्तरावर पाठवून त्यापैकी एका नावावर शिक्कामोर्तब होणार आहे.

आगामी महापालिका निवडणुकांपूर्वी या निवडणुकीच्या निमित्ताने पक्षांतर्गत मतभेद उफाळून येऊ नयेत, याची पुरेपूर खबरदारी भाजपकडून घेण्यात आली असून त्यासाठीच राजकीय समिती, संघटनात्मक समिती आणि व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे. दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे या मतदार संघात २६ फेब्रुवारी रोजी पोटनिवडणूक होत आहे. टिळक कुटुंबियांपैकी एकाला उमेदवारी देण्याची मागणी आहे. त्यामुळे मुक्ता टिळक यांचे पती शैलेश आणि मुलगा कुणाल या दोघांच्याही नावाची शिफारस करण्यात आली आहे.

त्यापैकी कुणाल टिळक यांचा प्रत्यक्ष राजकारणातील अनुभव कमी आहे. त्यामुळे शैलेश टिळक हे उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार मानले जातात. अन्य तिन्ही उमेदवार हे मागील विधानसभा निवडणुकीमध्ये इच्छुक होते. त्यावेळी मुक्ता टिळक यांना पक्षाने संधी दिली होती. त्यामुळे आता टिळक कुटुंबियांऐवजी अन्य इच्छुकाला उमेदवारी देण्याचाही पक्षातील काहीजणांचा आग्रह आहे.

गेल्या महापालिका निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव झाल्यानंतर पक्षाने त्यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून वर्णी लावून पुन्हा महापालिकेत प्रवेश दिला.

## 'भारत जोडो' यात्रेमुळे महाविकास आघाडीची पोटनिवडणूक बैठक लांबणीवर

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेच्या समारोपासाठी शहर काँग्रेसचे पदाधिकारी काश्मीर येथे दाखल झाले आहेत. दरम्यान, प्रमुख पदाधिकारी यात्रेच्या समारोपाला गेल्याने कसबा विधानसभा पोटनिवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने काँग्रेसच्या पातळीवर पुढील दोन दिवस कोणतीही चर्चा होणार नसल्याचे स्पष्ट झाले असून महाविकास आघाडीची बैठकही लांबणीवर पडली आहे. काँग्रेसचे प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, आमदार संग्राम थोपटे, प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, माजी आमदार दिप्ती चवधरी, माजी नगरसेवक अजित दरेकर, संगिता तिवारी, मेहबूब नदाफ हे काँग्रेसकडून काश्मीरसाठी रवाना झाले आहेत, अशी माहिती शहर काँग्रेसकडून देण्यात आली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या यात्रेचा सामारोप सोमवारी होणार आहे.

कसब्याच्या आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यात येणार आहे. ही निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेनेकडून महाविकास आघाडी म्हणून लढविली जाणार आहे. त्यासंदर्भात या तिन्ही पक्षांची संयुक्त बैठक येत्या दोन दिवसांत होणार होती. मात्र काँग्रेस पदाधिकारीच यात्रेच्या समारोपाला गेल्याने ही बैठकही लांबणीवर पडली आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस यावर कोणतीही चर्चा होणार नाही. तसेच कसब्याच्या निवडणुकीत महाविकास आघाडी होणार की नाही यावर आधी निर्णय घेतला जाणार आहे, त्यानंतरच काँग्रेसचा उमेदवार जाहीर होण्याची शक्यता आहे. यासाठी तिन्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची येत्या आठवड्यात बैठक होऊन त्याचा निर्णय होईल.



## शॉर्ट न्यूज

### चंद्रकांत पाटलांची तुलना थेट महात्मा फुलेंशी!

**पुणे : राज्यात मागील काही दिवसांपूर्वी महापुरुषांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्यावरून वातावरण तापलं होतं. असे असताना भाजप नेत्यांकडून होणाऱ्या वादग्रस्त वक्तव्यांची मालिका मात्र थांबताना दिसत नाहीयेत. आता पुन्हा एकदा भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांच्या विधानावरून वाद पेटण्याची शक्यता आहे.पुण्यात बोलताना भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी अजब विधान केलं आहे. चित्रा वाघ यांच्याकडून चंद्रकांत पाटील यांची तुलना थेट महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी करण्यात आली आहे. चित्रा वाघ म्हणाल्या की, तुम्हाला सावित्रीबाई घरोघरी दिसायला लागल्या आहेत. मात्र चंद्रकांत पाटील यांच्या सारख्या ज्योतिबाचा शोध जारी आहे, असे विधान चित्रा वाघ यांनी केलं आहे.**

# आळंदीत थाटलीय बेकायदा भाजीमंडई

।आळंदी । महाईन्यूज ।प्रतिनिधी।



**भाजी बाजारासाठी स्वतंत्र प्रशस्त जागा पालिकेने उपलब्ध करून देणे गरजेचे**

खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या पोलिस ठाणे ते आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या आवारातील रस्त्यावर पालिकेने लाखो रुपये खर्च केले. सोबत रस्त्यावर विक्रेत्यांनी हातगाड्या, ठेले अथवा कोणी गाडीही पार्क केल्यास त्यांच्यावर कारवाई होईल असा आदेशाचा फलक लावला.

मात्र फलकाला लागूनच पथारीवाले आणि हातगाड्यांची भाऊगर्दी झाली. परिणामी परिसरातील नोकरदार, कामगार, शालेय विद्यार्थ्यांबरोबरच रुग्णवाहिकांनाही येथून जाणे अवघड झाले आहे.

आळंदी येथील पोलिस ठाणे ते आळंदी ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य फाटकापर्यंत रस्त्यावर वर्दळीच्या ठिकाणी भाजी विक्रेते, फळ विक्रेते, फेरीवाले बसू नये यासाठी कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल असा फलक आळंदी नगरपरिषदेने लावला. पण कारवाई अद्याप कोणावरच झाली नाही. रस्त्यावर दुतर्फा भाजी विक्रेते व विविध वस्तू विकणारे विक्रेते बसल्याने येथील रस्ता अरुंद झाला असून नागरिकांना व वाहनांना रहदारीसाठी अडसर निर्माण होत आहे. दुतर्फा काही विक्रेते खाटा मांडूनच रस्त्यावर विक्रेते धंदा करतात. तसेच, दुतर्फा वाहनेही लागलेली असतात. रस्त्यावर बसलेल्या भाजी विक्रेत्यांमुळे येथील पालिकेचे गाळाधारक सुद्धा स्वतः च्या गाळ्यासमोर रस्त्यावरच भाजी ठेवू लागले आहेत. सायंकाळी चारनंतर तर विक्रेत्यांच्या गर्दीतून वाट काढणे मुश्कील होते.

ग्रामीण रुग्णालयातील रुग्णवाहिकेला सुद्धा रुग्ण ने आण करण्यास उशीर होतो. ग्रामिण रुग्णालयाच्यावतीने याबाबत तक्रारी करण्यात आल्या. पालिकेने कारवाईचा फलक लावला. पण प्रत्यक्ष कारवाई कधी अशी विचारणा नागरिक करत आहेत.

### खासगी संघटनांचे फलक

पालिका कार्यालयाला लागून आठ वर्षांपूर्वी भाजीमंडई करून पालिकेने गाळे वितरित केले. पण आता पालिकेच्या मालकीच्या फलकाऐवजी खासगी संघटनांचे फलक या व्यावसायिकांनी लावलेत. बेकायदा फलकही हटविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### स्वतंत्र जागा द्यावी

स्थानिक शेतकरी भाजीविक्रेते यांची सद्यस्थितीला संख्या विचारात घेता भाजी बाजारासाठी स्वतंत्र प्रशस्त जागा पालिकेने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.


# जगताप कुटुंब ‘अभेद्य’!

## मतभेद नाही : बिनविरोध नसेल, तर लढाईची तयारी

। पिंपरी । वैष्णव जाधव
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या कुटुंबियांमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. मात्र, पोटनिवडणुकीतील उमेदवारीवरुन जगताप कुटुंबात दोन गट असल्याचा अफवा जाणीवपूर्वक पसरवल्या जात आहेत.**







यामध्ये सत्यता नाही, जगताप कुटुंब ‘अभेद्य’ आहे, असे सुतोवाच जगताप घराण्यातील निकटवर्तीयांनी केले आहे.

चिंचवड पोटनिवडणूक उमेदवारीवरुन जगताप कुटुंबातील कुणाला भाजपाची उमेदवारी मिळणार? याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. जगताप यांच्या पत्नी आश्विनी जगताप आणि बंधू शंकर जगताप यांच्यात उमेदवारीबाबत मतभेद आहेत, असा दावा केला जात आहे. मात्र, चार दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थित झालेल्या पोटनिवडणूक पूर्वतयारी आढावा बैठकीला आश्विनी जगताप आणि शंकर जगताप दोघेही उपस्थित होते. यानंतर प्रसारमाध्यमांशी शंकर जगताप सामोरे गेले.




कोणत्याही परिस्थिती लक्ष्मण जगताप यांनी ज्याप्रमाणे भाजपाशी पक्षनिष्ठा कायम ठेवली. आजारी असतानाताही रुग्णवाहिकेतून मुंबईला प्रवास केला. राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीसाठी मतदान केले. तसाच पक्षनिष्ठेचा वारसा आम्ही कुटुंबीय पुढे चालवणार आहोत, असे जाहीरपणे शंकर जगताप यांनी सांगितले.

दरम्यान, भारतीय जनता पार्टीकडून चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे प्रमुख विरोधी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील तीव्र इच्छुकांचा भ्रमनिरास होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे निवडणूक बिनविरोध होवू नये, या करिता जगताप घराण्यातील उमेदवार राष्ट्रवादीच्या तिकीटवर लढवावा, यासाठी राष्ट्रवादीतील स्थानिक नेत्यांचा एक गट कार्यरत झाला आहे. पण, २०१४ पासून पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाचे वर्चस्व ठेवण्यासाठी दिवंगत जगताप यांनी राष्ट्रवादीशी संघर्ष केला. मग, त्यांच्या घराण्यातील कोणीही उमेवार राष्ट्रवादीच्या उमेदवारी घेईल का? हा खरा प्रश्न आहे. मात्र, शंकर जगताप यांना उमेदवारी मिळाल्यास, आगामी १५ वर्षे संभाव्य प्रतिस्पर्धींना संधी मिळणार नाही. त्यामुळे राजकीय भवितव्य टिकवण्यासाठी जगताप घराण्यात फूट पाडण्याचे षडयंत्र रचले जात आहे. परंतु, जगताप घराण्यातील परस्पर समंजसपणा पाहता कुटंबातील एकोपा कायम आहे, असेच अधोरेखित होते.

### जगतापांचे राजकीय उत्तराधिकारी शंकर जगतापच...

लक्ष्मण जगताप यांचे निधन होवून आज २६ दिवस झाले. अद्याप जगताप कुटुंबीय आणि समर्थक या दु:खातून सावरलेले नाहीत. अशा परिस्थितीत अनपेक्षीतपणे पोटनिवडणूक लागली. या निवडणुकीतील उमेदवारीवरुन जगताप यांचे राजकीय वारसदार कोण? असा प्रश्न उपस्थित केला जावू लागला. मात्र, दोन वर्षापूर्वीच लक्ष्मण जगताप यांनी आपला राजकीय उत्तराधिकारी अप्रत्यक्षपणे घोषीत केला होता. चिंचवड विधानसभा भाजपा निवडणूक प्रभारीपदी शंकर जगताप यांनी नियुक्ती दिवंगत आमदार जगताप यांच्या सूचनेनुसारच केली होती. त्यांनी गेल्या काही दिवसांपासून मतदार संघ पिंजून काढला. भाजपाच्या सर्व बैठका आणि सभा, समारंभ, कार्यक्रमांमध्ये शंकर जगताप यांचा सहभाग हा ‘नेक्ट टू एमएलए जगताप’ असाच राहिला आहे. जगताप यांना आश्विनी जगताप यांना राजकीय धुरा सोपवायची असती, तर त्यांनी दोन वर्षापूर्वीच त्यांना मतदार संघामध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली असती, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

---

# भंडारा डोंगर येथे संत तुकाराम महाराजांचे भव्य मंदिर उभे राहील!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : श्री क्षेत्र भंडारा डोंगराला विविध मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथील श्री संत तुकाराम महाराज मंदिरात सुरू असलेल्या माघ दशमी सोहळ्यात सहभाग घेतला.**

महाराष्ट्रातील तीर्थस्थाने भव्य दिव्य व्हावीत अशी सर्वांची भावना असून, श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे सर्वांच्या प्रयत्नाने श्री संत तुकाराम महाराजांचे भव्य मंदिर उभे राहील. मंदिर उभारण्याशी संबंधित अडचणी दूर केल्या जातील, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार संजय शिरसाठ, भरत गोगावले, माजी मंत्री बाळा भेगडे, मंदिर समितीचे अध्यक्ष ह.भ.प.बाळासाहेब काशिद पाटील आदी उपस्थित होते.

संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीला वंदन करायला आणि वारकऱ्यांना भेटायला आल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, संत तुकोबारायांच्या दर्शनासाठी भंडारा डोंगर येथे छत्रपती शिवाजी महाराज आले होते. अशा पावन भूमीत येण्याचे भाग्य आपल्याला मिळाले आहे. भंडारा डोंगर आगळ्यावेगळ्या ऊर्जेने भरला आहे.

या परिसराचा विकास करताना या श्रद्धास्थानाचे पावित्र्य कायम राहिले पाहिजे. विकासकामे करताना वारकऱ्यांच्या श्रद्धेला ठेच लागू देणार नाही. त्यामुळेच रिंगरोडच्या मार्गातही बदल करण्यात आला. अयोध्येतील



श्रीराम मंदिराप्रमाणे जगातील अतिशय भव्य मंदिर इथे उभे राहिल. श्रद्धा आणि तळमळ असल्यास अशी कामे उभी राहतात. श्री क्षेत्र भंडारा डोंगर परिसराचा चांगला विकास आराखडा तयार करावा, त्यासाठी शासनाचे सर्व सहकार्य राहील, असे श्री.शिंदे म्हणाले.

महाराष्ट्राला थोर संतांची परंपरा लाभली आहे. वारकरी संप्रदायाच्या रुपाने समाजाला दिशा देणारी मोठी शक्ती महाराष्ट्रात आहे. आपले सण, उत्सव, परंपरा पुढे नेण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले आहे. ही परंपरा आपणही पुढे न्यायला हवी. वारकरी संप्रदायाने समाजप्रबोधनाचे महत्वाचे कार्य सातत्याने केले आहे. आध्यात्मिक विचाराने जीवन सफल होतं. आध्यात्मिक सोहळ्यातून अनेकांच्या जीवनामध्ये आमुलाग्र बदल घडून जीवन सुखी, समृद्ध आणि संपन्न होत असते. उभारण्यात येणाऱ्या भव्य मंदिरापासून भक्ती, श्रद्धा, मांगल्याची भावना आणि प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी मुख्यमंत्र्यांनी श्री संत तुकाराम महाराज मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले आणि जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या भव्य मंदिर उभारणीच्या कामाची पाहणी केली. श्री संत तुकाराम महाराजांच्या भव्य मंदिरासाठी वारकरी दत्तात्रेय कराळे यांनी पाच लक्ष रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. प्रास्ताविकात श्री. काशिद पाटील यांनी श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे उभारण्यात येणाऱ्या श्री संत तुकाराम महाराजांच्या भव्य मंदिराच्या कामाची माहिती दिली.

### भव्य मंदिर उभारणीच्या कामाची पाहणी

**खासदार बारणे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. पालखी मार्गाचे काम आणि पंढरपूर विकासासाठी मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतल्याचे त्यांनी सांगितले.**

## संपादकीय »

# प्रदूषणाची मगरमिठी दिवसेंदिवस घट्ट

***बोईसर तारापूर एमआयडीसीमधील कंपन्यांमधून प्रक्रिया न केलेले दूषित रासायनिक सांडपाणी बेमालूमपणे समुद्रात सोडले जात असल्याचे काही दिवसांपूर्वी तटरक्षक दलाने हेलिकॉप्टरमधून केलेल्या व्हिडीओतून दिसले.***

यामुळे जलप्रदूषणाचा विळखा अधिक घट्ट होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. बोईसर येथील प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रदूषित पाणी थेट समुद्रात सोडणाऱ्या कारखान्यांवर केवळ थातूरमातूर कारवाई करत असते. येथील प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कोट्यवधी रुपये दंड करणाऱ्या हरित लवादाच्या कारवाईलाही उद्योजक भीक घालत नसल्याचेही या घटनेनंतर दिसून आले आहे. बोईसर तारापूर एमआयडीसीतील कारखान्यांतील रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्लॉट ओएस-३० मध्ये ५० एमएलडी क्षमतेचा नवीन सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यात आला आहे, मात्र गेल्या काही दिवसांपासून प्रक्रिया बंद आहे. एमआयडीसीमधील औद्योगिक वसाहतींमधून उत्पादन वाढल्याने ३५ एमएलडी क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याला मंजुरी मिळाल्यानंतर ५० एमएलडी क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रियेची वाहिनी थेट समुद्रात ७.१ किमी इतक्या खोल टाकली आहे.

५० एमएलडी क्षमतेच्या प्रक्रिया केंद्रात १०० एमएलडी पाणी येत असल्यामुळे अतिरिक्त ५० एमएलडी पाणी प्रक्रिया न करताच त्याची समुद्रात विल्हेवाट लावली जात असल्याचेही निष्पन्न झाले आहे. मागील अनेक वर्षांपासून बोईसर एमआयडीसीच्या कारखान्यांमधून सोडण्यात येणारे प्रदूषित सांडपाणी २५ एमएलडी सीईटीपीच्या क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ३५ ते ४० एमएलडी इतके सोडले जात असल्याने सातपाटी, नवापूर, दांडी, उच्छेळी, मुरबे आदी परिसरातील खाड्यांमधील जैवविविधता नष्ट होत आहे. या भागातील सालवड, पास्थळ, कुंभवली, एकलारे, पाम, टेंभी या गावातील शेती नापीक बनली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तारापूर पर्यावरण संरक्षण संस्थेला जल कायदा १९७४ अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पाठवला आहे. सतत जल आणि वायू प्रदूषणाच्या घटना, किनारपट्टीवर सोडल्या जाणाऱ्या प्रदूषित रासायनिक पाण्यामुळे मच्छीमार, शेतकऱ्यांनी बोईसरच्या एमपीसीबी, एमआयडीसी, सीईटीपी कार्यालयावर मोर्चे नेले होते, मात्र तात्पुरते कारखाने बंद करण्याच्या नोटिसा पाठवून व नंतर कारखानदारांकडून प्रदूषण करणार नाही, अशी हमी घेऊन व काही हजारांचा दंड भरून कंपन्या पुन्हा प्रदूषण करण्यास मोकळ्या झाल्या आहेत. अनेक कारखान्यांमधून निघणारे सांडपाणी प्रक्रिया न करताच अनेकदा नाल्यात सोडले जात.

# उद्योग व्यवसायातील बदल






**जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या ३ प्रक्रियांमुळे भारतीय समाजावर, शहरांवर, खेड्यांवर, शेतकरी, कामगार, गरीब, श्रीमंत, शहरी, मागास, शिक्षित, अशिक्षित आणि मध्यम वर्गावरही याचा काय परिणाम होतो आहे हे आपण अनुभवतो आहोतच. हे सर्व घडलेच नसेल तर? आपल्या जीवनात काही बदल झालाच नसता का? वास्तव हे आहे की आयुष्यात कधीही न बदलणारी गोष्ट म्हणजे बदल होय. एक माणूस ज्योतिषाकडे जातो आणि विचारतो की मला खूप त्रास होतो आहे. खूप कष्ट करावे लागतात, यश येत नाही, पैसे टिकत नाहीत. तर तो ज्योतिषी त्याला सांगतो की तुला साडेसाती सुरू आहे आणि अजून दोन वर्षे तुला खूप कष्ट करावे लागतील.**

**तो माणूस विचारतो दोन वर्षांनंतर सर्व ठीक होईल ना? ज्योतिषी सांगतो सर्व ठीक नाही होणार, पण तुला या सर्वांची सवय होऊन जाईल आणि तुला काही त्रास नाही जाणवणार. बदल ही सुरुवातीला नकोशी वाटणारी: परतु नंतर अंगवळणी पडणारी आणि जीवन समृद्ध करणारी गोष्ट आहे. आपण या बदलाला किती परिणामकारकपणे सामोरे जातो यावर आपल्याला मिळणाऱ्या यशाचा स्तर अवलंबून आहे. बदल ही टाळता येण्यासारखी गोष्ट नाहीच. ती एक आयुष्यातील अपरिहार्य गोष्ट आहे. तेव्हा आपण बदलाला विरोध करणे थांबवायला हवे. याउलट होणाऱ्या बदलाचा उपयोग आपल्या फायद्यासाठी कसा करून घेता येईल याचा विचार करून त्यावर आधारित कृती करायला हवी.**

**पूर्वी स्थैर्य ही मध्यवर्ती संकल्पना होती. आता काही प्रमाणात अस्थिरता ही प्रगतीसाठी आवश्यक वाटू लागती आहे. जे बदलाला विरोध करतात त्यांच्यापेक्षा जे गोंधळ किंवा सतत होणाऱ्या बदलावर प्रेम करतात त्यांनाच यश माळ घालते. बदल आणि अनिश्चितता तर आयुष्यातील अटळ गोष्टी आहेत, पण मागील काही वर्षांत उद्योग व्यवसायात होत असणारे अचानक आणि मोठे बदल सतावणारे आहेत. कारण या बदलांचे परिणाम जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारे आहेत. त्यामुळे यापुढे येणाऱ्या बदलांची अनिश्चितता आणि सामर्थ्य काय असेल यांचीच थोडी चिंता आहे. कोविडनंतरसुद्धा उद्योग व्यवसायात अनेक बदल झाले आहेत.**

**होणारे बदल शांतपणे आणि व्यवस्थित समजावून घेतले आणि त्यावर डोळस उपायायोजना केल्या, तर अशा बदलांचा उपयोग करून मानवाचे जीवनमान अधिक उंच आणि समृद्ध करता येईल. बदलाचा सकारात्मक परिणाम मिळण्यासाठी आपण बदलांना कसे सामोरे जातो, त्याचा सामना कसा करतो, त्याचे स्वागत कसे करतो हे फार महत्वाचे असते. बदल घडताना काय करायाला हवे, कसे करायला हवे याबद्दल थोडा विचार करू या.**

**बदलाचा पहिला टप्पा ओळखा.**

**निसर्गातील ही एक घटना बघा. बेडकाला जर एकदम गरम पाण्यात टाकले, तर ते पटकन उडी मारून बाहेर पडते: परंतु बेडूक असणाऱ्या पाण्याचे तापमान एका वेळेस एक डिग्री याप्रमाणे वाढवित उकळले, तर बेडूक त्यात मरण पावतो. आपलेही तसेच आहे. हुळूहळू आणि नकळत होणाऱ्या बदलांकडे आपले लक्ष जात नाही. त्यामुळे होणाऱ्या गंभीर परिणामांना मात्र आपण बळी पडतो, त्यांचे घातक परिणाम आपल्याला भोगावे लागतात. आपल्या आजूबाजूला होणाऱ्या बारीक सारीक बदलांकडे लक्ष ठेवा. त्याचा सकारात्मक उपयोग कसा करून घेता येईल आणि दुष्परिणाम कसा टाळता येईल यावर योग्यवेळी विचार करा.**

# रिकाम्या हातांची चिंता

**वाढती लोकसंख्या आणि सौहार्दपूर्ण, विकसनशील समाजस्वास्थ्य यांचा अन्योन्य संबंध आहे. केवळ संततीनियमनाची साधने पुरवून ही समस्या सुटणार नाही. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार हे मूलभूत संविधानिक अधिकार नागरिकांना प्राप्त झाले तर देशात खूप मोठा चांगला बदल होऊ शकतो; अन्यथा रिकामे हात आणि रिकामी डोकी देशाला कुठे घेऊन जातील ते सांगता येणार नाही.**

लोकसंख्येच्या बाबतीत भारताने चीनला मागे टाकले आहे. आजच्या घडीला भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे आणि पुढील काही दशके तरी याबाबतीत अग्रस्थानी राहण्याचा भारताचा मान अन्य कोणता देश हिरावून घेईल अशी शक्यता नाही. कालच्या १८ जानेवारीला भारताची लोकसंख्या १४२ कोटींवर गेल्याची नोंद वर्ल्ड पॉप्युलेशन रिव्ह्यूने केली आहे. या नोंदीमुळे लोकसंख्येच्या बाबतीत चीन आता दुसऱ्या क्रमांकावर ढकलला गेला आहे.

त्या देशाची लोकसंख्या १४१ कोटी इतकी नोंदवली गेली आहे. त्या देशाने १९५८ ते १९६२ या काळात राबवलेली ग्रेट लीप फॉरवर्ड मोहीम, कुटुंबात एकच अपत्य असे धोरण आणि 'लॅटर, लाँगर, फ्यूवर फॅमिली प्लॅनिंग' म्हणजे उशीर वयात आणि कमीत कमी अपत्ये हा प्रचार या सर्वांच्या परिणामी चीनचा लोकसंख्यावाढीचा दर वेगाने खाली



आला. तज्ज्ञांच्या मते येत्या काही वर्षांत राहणीमानावरील वाढता खर्च आणि अन्य कारणांमुळे चीनची लोकसंख्या येत्या दशकात आणखी खाली येईल.

दुसरीकडे भारताची लोकसंख्या २०५० पर्यंत वाढतीच राहणार असून २०३६ मध्ये ती १५२ कोटींवर जाईल, असे भाकीत भारताच्या राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाने केले आहे. यापेक्षाही लक्षवेधक म्हणजे २०२२ ते २०५० या कालावधीत जगाच्या लोकसंख्येत काँगो, इजिप्त, भारत, नायजेरिया, पाकिस्तान, फिलिपाईन्स आणि टांझानिया या देशांमधील लोकसंख्यावाढीमुळे जी भर पडेल ती एकूण जागतिक लोकसंख्येत निम्मी असेल. म्हणजेच अर्धे जग केवळ या सात देशांमध्ये सामावलेले असेल.

इथे आवर्जून उल्लेख करायला हवा, की जगात कुटुंब नियोजन कार्यक्रम सरकारी स्तरावर अधिकृतपणे स्वीकारणारा पहिला देश आपला भारत आहे. १९५२ मध्ये देशाने याची अंमलबजावणी सुरू केली. हे धोरण भारताने स्वीकारण्यास अनेक समाजसुधारकांचे मोलाचे योगदान आहे. कर्ते आणि निर्भीड सुधारक रघुनाथ धोंडो कर्वे ऊर्फ र. धों. कर्वे हे या संदर्भातील खूप मोठे, महत्त्वाचे आणि ज्याला टाळून पुढे जाताच येणार नाही असे नाव. भारतातील पहिले कुटुंब नियोजन केंद्र आपल्या महाराष्ट्रात, पुण्यात १९२१ मध्ये कर्व्यांनी सुरू केले. म्हणजेच आज १०० च्या वर वर्षे उलटून गेली आहेत. अपत्यसंख्या मर्यादित ठेवणाऱ्या साधनाबाबत त्या काळात जागृती करणे किती अवघड काम असेल हे आजही याबाबत किती अज्ञान आणि पूर्वग्रह व समजुती आहेत ते पाहून लक्षात यावे.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघासाठी आज मतदान

## 5 मतदारसंघात तयारी पूर्ण, दोन फेब्रुवारीला मतमोजणी होणार

।मुंबई । महाईन्यूज ।

**दोन पदवीधर आणि तीन शिक्षक अशा पाच मतदारसंघात उद्या (सोमवार, 30 जानेवारी 2023) मतदान होणार आहे. यामध्ये नाशिक ,अमरावती पदवीधर तर औरंगाबाद, नागपूर आणि कोकण शिक्षक मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या निर्णयानुसार 30 जानेवारी 2023 रोजी मतदान होणार आहे.**



तर, दोन फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. पाचही मतदारसंघातील लढती रंगतदार होणार आहेत. पण नाशिक मतदार संघाकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलंय. पहिल्या दिवसांपासून ते आतापर्यंत नाशिक मतदारसंघात नवनव्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. त्याशिवाय नागपूर शिक्षक मतदारसंघाकडेही लक्ष लागलेय.

नागपूर जिल्हयात या निवडणूकीसाठी 16 हजार 480 एवढी पात्र शिक्षक मतदार आहे. यासाठी जिल्हयात एकूण 43 मतदान केंद्र आहेत.

राज्यातील सत्तांतरानंतर होत असलेल्या निवडणुकांमुळे उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

मागील निवडणुकीचा इतिहास पहिला तर औरंगाबाद शिक्षक मतदारसंघात राष्ट्रवादीचे विक्रम काळे, नागपूर शिक्षक मतदारसंघात अपक्ष नागो गाणार, कोकण शिक्षक मतदार संघात अपक्ष बाळाराम पाटील, नाशिक पदवीधर मतदारसंघात काँग्रेसचे सुधीर तांबे आणि अमरावती पदवीधर मतदार संघात भाजपचे रणजीत पाटील हे निवडून आले होते. या पाचही जागांची मुदत 7 फेब्रुवारी रोजी संपत आहे. सोमवारी या पाचही जागांसाठी मतदार होणार आहे. निवडणूक आयोगाची तयारी पूर्ण झाली आहे. राज्यातील सत्तांतरानंतर होत असलेल्या निवडणुकांमुळे उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### कोकण शिक्षक मतदार संघ

बाळाराम पाटील ( शेकाप)
ज्ञानेश्वर म्हात्रे ( भाजप)
औरंगाबाद शिक्षक मतदारसंघ
विक्रम काळे ( राष्ट्रवादी)
किरण पाटील ( भाजप)

**नाशिक पदवीधर**
शुभांगी पाटील (अपक्ष)
सत्यजित तांबे (अपक्ष)
धनराज विसपुते (अपक्ष)
धनंजय जाधव (अपक्ष)

**नागपूर शिक्षक**
गंगाधर नाकाडे (मविआ - शिवसेना)
नागो गाणार ( भाजप पाठींबा)

**अमरावती पदवीधर**
धीरज लिंगाडे (मविआ - कॉंग्रेस)
डॉ. रणजित पाटील( भाजप उमेदवार)

### कोकण शिक्षक मतदार संघात काय स्थिती?

» कोकण शिक्षक मतदार संघात यंदा भाजप युती आणि महाविकास आघाडीमध्ये चुरस होण्याची चिन्हे आहेत. यामध्ये आमदार बाळाराम पाटील आणि ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्यामध्ये बाजी कोण मारणार हे पहावे लागणार आहे. बाळाराम पाटील मागील निवडणुकीत विजयी झाले होते, त्यांना यंदा महाविकास आघाडीने पाठिंबा दिलाय. तर मागच्या खेपेला पराभूत झालेल्या ज्ञानेश्वर म्हात्रे यांना यावेळी भाजप आणि शिंदे गटाने पाठिंबा दिलाय.

### अशी असते मतदान प्रक्रिया...

» निवडणुकीसाठी जितके मतदार उभे असतील तेवढ्या उमेदवार ना पसंती क्रम देता येतो. महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्ये शिक्षक, पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका होतात. विधान परिषद सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षांचा असतो. विधान परिषद स्थायी सभागृह आहे. ते कधीही विसर्जित होत नाही. दर दोन वर्षांनी सभागृहाचे एकास तीन सदस्य निवृत्त होतात तेवढेच नव्याने निवडतात.

# उजनीचा ५० वर्षे जुना डावा कालवा पाटकूलजवळ फुटला

## शेतकऱ्यांचे मोठं नुकसान: पंचनामे करून योग्य ती भरपाई

।सोलापूर । महाईन्यूज ।

**उजनी धरणातून शेतीसाठी १८ जानेवारीपासून डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आले आहे. सुरवातीला कमी वेगाने पाणी सोडले होते, पण काही अडथळा नसल्याने त्याचा वेग वाढवला होता. वास्तविक पाहता डाव्या कालव्यात १४०० क्युसेक पाणी मावते आणि सध्या १२५० क्युसेकपर्यंतच पाणी सोडले होते. तरीदेखील अचानक डावा कालवा फुटल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरले आहे. त्या कालव्याला जवळपास ५० वर्षे पूर्ण झाली असल्याने अनेक ठिकाणी कालवा जीर्ण झाला आहे.**

शेतीसाठी सोडलेले धरणातील पाणी बंद करण्यात आले असून कुरुल, बेगमपूर व कारंबा भागातील शेतकऱ्यांना आता आठ-दहा दिवसांनी पुन्हा पाणी सोडले जाणार आहे. तत्पूर्वी, लोखंडी अँगल टाकून त्या डाव्या कालव्याच्या फुटलेल्या ठिकाणाची दुरुस्ती केली जाणार आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्यांना योग्य ती भरपाई दिली जाईल, अशी ग्वाही लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी दिली.



### ठळक बाबी...

- » उजनी धरणातून शेतीसाठी पाणी सोडण्यात आले असून त्याच दरम्यान पाटकूल (ता. मोहोळ) येथे डावा कालवा फुटला आहे.
- » १२५० क्युसेक वेगाने पाणी सोडले होते; कालवा फुटल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरले आहे.
- » शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून पंचनामे करून त्यांना भरपाई दिली जाणार आहे.
- » फुटलेला डावा कालवा ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आला असून त्याची क्षमता १४०० क्युसेक एवढी आहे.
- » शेतात साचलेल्या पाण्याचा वाट मोकळी करून दिली असून जवळील ओढ्यात पाणी सोडले जात आहे.
- » बेगमपूर, कुरुल व कारंबा या परिसरातील शेतकऱ्यांचे पाणी आता बंद करण्यात आले आहे.
- » आठ-दहा दिवसांत त्याची दुरुस्ती करून पुन्हा शेतकऱ्यांसाठी पाणी सोडले जाणार आहे.

# असंतोषामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार लांबतोय; एकनाथ खडसे

। डोंबिवली - । महाईन्यूज ।



सरकार स्थापन होऊन सात महिने उलटले तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला नाही. वेट ॲण्ड वॉच च्या भूमिकेत साऱ्यांना ठेवले जात आहे. 18 मंत्री सरकार सध्या चालवत आहेत. वास्तविक सत्ताधारी पक्षातील प्रत्येक आमदाराला मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची इच्छा आहे.

मंत्रिमंडळाचा एकदा विस्तार झाला की आरोआप असंतोष उफाळून येईल. त्या असंतोषाला तोंड देणे कठीण जाऊन म्हणून मंत्रिमंडळाचा विस्तार केला जात नाही असे वक्तव्य करत शिंदे व फडणवीस सरकारला राष्ट्रवादीचे नेते आमदार एकनाथ खडसे यांनी लक्ष केले आहे.

कल्याण येथील लेवा पाटील समाजाच्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादीचे नेते खडसे हे उपस्थित होते. यावेळी शिंदे व फडणवीस सरकार मंत्रिमंडळाचा विस्तार लांबणीवर पडत आहे याविषयी खडसे यांना विचारणा केली. यावर ते म्हणाले, 18 मंत्री राज्याचा कारभार पाहत आहेत.

त्यामुळे योग्य तो निर्णय होऊ शकत नाही. जनसंपर्क कमी पडतोय. भाजपमधील अनेक आमदार व शिंदे गटातील सर्व आमदार मंत्रि मंडळात यायला इच्छुक आहेत. त्यामुळे कोणाला मंत्री मंडळात घ्यायचे हा पेच असल्याने मंत्रिमंडळाचा विस्तार होत नाही असे ते म्हणाले.

आंबेडकर आणि ठाकरे युती विषयी खडसे म्हणाले, प्रकाश आंबेडकर आणि उद्धवजी ठाकरे यांच्यात युती झाली. मात्र याबाबत युतीचा प्रस्ताव किंवा कुठलेही बोलणे राष्ट्रवादी कॉंग्रेस सोबत झाले नाही. तसा प्रस्ताव देखील आला नसल्याचे शरद पवार यांनी कालच सांगितलं आहे.

### मंत्रिमंडळाचा विस्तार लांबतोय

» मंत्रिमंडळाचा एकदा विस्तार झाला की आरोआप असंतोष उफाळून येईल. त्या असंतोषाला तोंड देणे कठीण जाऊन म्हणून मंत्रिमंडळाचा विस्तार केला जात नाही असे वक्तव्य करत शिंदे व फडणवीस सरकारला राष्ट्रवादीचे नेते आमदार एकनाथ खडसे यांनी लक्ष केले आहे.

# अंधार आणि नुसताच अंधार..!

## पाकिस्तानातील लाहोर, कराचीसह महत्त्वाची शहरं अंधारात, पाकिस्तानचं भविष्यही अंधकारमय

। कराची । महाईन्यूज ।

**पाकिस्तानची आर्थिक स्थिती एवढी डबघाईला आली आहे की त्या देशाकडे आता वीज केंद्र चालवण्यासाठीही पैसा उरला नाही. परिणामी पाकिस्तानच्या महत्त्वाच्या शहरांमध्ये वीज संकटामुळे अंधार पसरला आहे. आधीच राजकीय आणि आर्थिक संकटांशी झगडत असलेला, आर्थिक दिवाळखोरीत गेलेल्या पाकिस्तानमध्ये सोमवारी ट्रान्समिशन लाईन्समध्ये बिघाड झाल्यामुळे अनेक शहरांमध्ये वीज खंडित झाला.**

कराची, लाहोर, इस्लामाबाद, क्वेटा आणि पाकिस्तानातील इतर प्रमुख शहरी केंद्रे वीजेविना अंधारात गेली होती. ऊर्जा संकटाचा सामना करणाऱ्या या शेजारील देशात गेल्या चार महिन्यांत ही वीज खंडित होणारी दुसरी मोठी घटना घडली आहे.

पाकिस्तानच्या ऊर्जा मंत्रालयाने आज सकाळी ट्वीट केलं. त्यामध्ये म्हटलं होतं की नॅशनल पॉवर ग्रिडमध्ये व्यापक बिघाड झाला आहे. परंतु देखभालीचे काम वेगाने सुरू आहे. नॅशनल ग्रीडची फ्रिक्वेन्सी सिस्टम आज सकाळी 7:34 वाजता खालावली गेली आणि परिणामी या प्रणालीमध्ये मोठ्या



प्रमाणात बिघाड झाला.

पेशावर आणि इस्लामाबादमधील ग्रीड स्टेशनमध्ये तपासणी सुरू असून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले जात आहेत असं पाकिस्तानच्या उर्जामंत्र्यांनी स्पष्ट केलं. येत्या 12 तासांमध्ये देशातील वीज पुरवठा सुरळीत केला जाईल असं आश्वासनही त्यांनी दिलं आहे.

देशातील मोठ्या भागातील वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे या देशातील नागरिकांमध्ये मात्र नाराजी पसरली आहे. पाकिस्तामधील या संकटामुळे सोशल मीडियावर #POWEROUTRAGE हे हॅशटॅग ट्रेन्ड होतंय. पाकिस्तानच्या या परिस्थितीवर मोठ्या प्रमाणात मीम्स तयार केले जात आहेत आणि ते व्हायरल केले जात आहेत.

एका ट्विटर यूजरने ट्वीट केले की, "भावनिक ब्रेक डाउन, मानसिक ब्रेक डाउन, फिजिकल ब्रेक डाउन के बाद पेश-ए-खिदमत हा पॉवर ब्रेकडाउन." दुसऱ्याने लिहिले, "उर्वरित जगामध्ये मध्यरात्र असल्यामुळे वीज गायब झाली आहे. पाकिस्तानमध्ये वीज खंडित झाली आहे, चला झोपायला जाऊया."

### पाकिस्तानची आर्थिक स्थिती डबघाईला

**कर्जाच्या फेऱ्यात अडकलेल्या पाकिस्तानात दिवसेंदिवस गरिबी वाढू लागल्याचं चित्र आहे. पाकिस्तानातल्या अन्न उत्पादनावर मोठा परिणाम झाला असून उपासमारीचं संकटाची चिन्हं दिसू लागली आहेत. देशातल्या बहुसंख्या नागरिकांना एकवेळचं जेवण मिळणंही अवघड झालंय. देशातला इंधन साठाही संपण्याची भीती आहे.**

# दिल्लीत भर पावसात रंगला बीटिंग द रिट्रीट

## प्रजासत्ताक दिन सोहळ्याची सांगता



।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

देशाची राजधानी दिल्लीतील विजय चौकात 'बीटिंग द रिट्रीट' या सोहळ्याने आज प्रजासत्ताक दिनाच्या विविध कार्यक्रमांची सांगता झाली. या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थिती लावली होती. बीटिंग द रिट्रीट हा सोहळा आज भर पावसात रंगला. यादरम्यान, देशातील सर्वात मोठा ड्रोन शो देखील झाला, ज्यामध्ये 3 हजार 500 स्वदेशी ड्रोनचा वापर करण्यात आला. या माध्यमातून आकाशात विविध कलाकृती सादर करण्यात आल्या.

विजय चौकात आयोजित करण्यात आलेल्या या भव्य कार्यक्रमादरम्यान प्रथमच उत्तर आणि दक्षिण ब्लॉकच्या समोरील भागात रंगीबेरंगी दिव्यांच्या माध्यमातून विविध आकृत्या प्रदर्शित करण्यात आल्या होत्या. भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित ट्यून हे यंदाच्या सोहळ्याचे खास आकर्षण होते. पावसाच्या दरम्यान, दिल्लीच्या विजय चौकातील या सोहळ्यात लष्करी बँडने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात नौदलाच्या बँडने 'एकला चलो रे'ची धून वाजवली होती. संरक्षण मंत्रालयानुसार, लष्कर, नौदल, हवाई दल आणि राज्य पोलीस आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (CAPF) यांच्या संगीत बँडद्वारे 29 मनमोहक आणि पाय-टॅपिंग भारतीय संगीत ध्वनीचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. बीटिंग द रिट्रीट समारंभाची सुरुवात ही 1950 च्या दशकाच्या सुरुवातीला करण्यात आली. जेव्हा भारतीय सैन्याच्या मेजर रॉबर्ट्सने मास बँडद्वारे प्रदर्शनाचा अनोखा समारंभ सुरू केला.

# शिवसेना अन शिवसेना भवन हेच हिंदुंसाठी आशास्थान!

## मोर्चावरून ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी महत्त्वाचं विधान

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लव जिहाद आणि धर्मांतरविरोधी कायदा राज्यासह देशभरात लागू करावा, या मागणीसाठी सकल हिंदू समाजाकडून शिवाजी पार्क येथे हिंदू जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.**



या मोर्चावरुन ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी महत्त्वाचं विधान केलं आहे. शिवसेना आणि शिवसेना भवन हेच हिंदूंचं आशास्थान असल्याचं आज सिद्ध झालं, असं राऊत म्हणाले. 'आज सखल हिंदू समाजाचा मोर्चा निघाला. शिवसेना भवनासमोर त्याचं विसर्जन झालं.

याचा अर्थ असाय की शिवसेना आणि शिवसेना भवन हिंदुंसाठी एकमेव आशास्थान आहे. बाकी हिंदू नेते आणि संघटना अपयशी आहेत.'



### 'भारत जोडो यात्रेला मोठा प्रतिसाद'

**राहुल गांधींनी चार हजार किलोमीटरची पदयात्रा केली. भारत जोडण्याचा त्यांनी संकल्प केला. त्यांच्या यात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. त्यांनी काश्मीरच्या चौकात तिरंगा फडकावून देशाला संदेश दिला आहे. युद्धापेक्षा प्रेमाने अनेक गोष्टी जिंकता येतात आणि देशाचं रक्षण करता येतं, हे राहुल गांधींनी सिद्ध केल्याचं संजय राऊत म्हणाले.**

### ...तरीही आक्रोश मोर्चाची गरज पडतेय- राऊत

**आठ वर्षांपासून शक्तिमान हिंदू नेत्यांचं देशात राज्य आहे. तरीही आक्रोश मोर्चा काढायची गरज पडू शकते, हे दुर्दैव आहे. शिवसेना भवनासमोर जमलेल्या सकल हिंदू समाजाने याविरोधात आक्रोश केल्याचं राऊत म्हणाले.**

# अनुपमा फेम रुपाली गांगुलीने पूर्ण केले तिचे स्वप्न, खरेदी केली 1 कोटींची कार



टीआरपीच्या यादीत प्रसिद्ध टीव्ही सीरियल अनुपमा नेहमीच टॉपवर राहते. हा शो नेहमीच प्रेक्षकांमध्ये सावली बनून राहतो. या शोची मुख्य अभिनेत्री रुपाली गांगुलीला अनुपमाच्या भूमिकेत खूप पसंत केले जात आहे. तिच्या दमदार अभिनयामुळे रुपालीने लोकांच्या हृदयात खास स्थान निर्माण केले आहे. तिला तिच्या चाहत्यांकडून भरभरून प्रेम मिळत आहे. दरम्यान, रुपाली तिच्या वैयक्तिक आयुष्यातही खूप आनंदी आहे. तिचे मोठे स्वप्न तिने पूर्ण केले आहे.

सर्वाधिक मानधन घेणारी टीव्ही अभिनेत्री रुपाली गांगुली आज खूप कमाई करत आहे. दरम्यान, तिने आपल्या कार कलेक्शनमध्ये आणखी एका लक्झरी कारची भर घातली आहे. स्वत: रुपालीने तिच्या सोशल मीडियावरून ही माहिती सर्वांसोबत शेअर केली आहे. अभिनेत्रीने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये रुपाली मर्सिडीज शोरूममध्ये पती आणि मुलासोबत दिसत आहे. तिने आपली नवीन कार घेतली आहे.



स्वप्न पाहण्यासाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल. माझ्या स्वप्नांना सत्यात उतरवण्याची संधी दिल्याबद्दल राजन शाहीचे आभार', राजन शाही अनुपमा या मालिकेचे दिग्दर्शक आहेत. स्वत: रुपाली गांगुलीने व्हिडिओ शेअर करून तिचा आनंद सर्वांसोबत शेअर केला आहे. अभिनेत्रीने मर्सिडीज बेंज GLE 300D कार खरेदी केली आहे. ते मिळाल्यानंतर तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. व्हिडीओमध्ये दिसत आहे की कंपनीने तिची कारही रुपालीला मोठ्या थाटात सुपूर्द केली आहे.


# 'तुम्ही राहू द्या!', अमृता फडणवीसांचं गाणं ऐकताचं पब्लिकनं लावला डोक्याला हात..

महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांची नेहमीच चर्चा असते. कुण्या कलाकारांचाही इतका चाहता वर्ग नसेल तितका अमृता फडणवीस यांचा आहे. त्याच्या गाणी त्याची फॅशन स्टाईल अशा बऱ्याच गोष्टीमुळे त्या नेहमीच चर्चेत असतात. 'मूड बनालीया' हे गाणं हे प्रेक्षकांना खुपच आवडलं. अल्पवधीतच या गाण्याने मिलियन व्ह्यूजचा टप्पा पार केला.

अशातच त्यांनी आता आगामी BHARATEEYANS या चित्रपटात गाणे गायले आहे. 'सारे जहां से अच्छा हिंदोस्ता हमारा' हे या गाण्याचे बोल आहेत. प्रतासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे गाणं प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सत्या कश्यप यांचे हे गाणे आहे. तर अमृता यांनी या गाण्याला आवाज दिला आहे. अमृता यांनी हे नवीन गाणं त्याच्या इन्स्टाग्रामवरही शेअर केलं. त्याच्या या गाण्याला मोठ्या प्रमाणात नेटकऱ्यांनी वेगवेगळ्या कमेंटस करणं सुरु केले आहे.





# शहनाजचे तारे चमकले!



बिग बॉस 13 ची स्पर्धक शहनाज गिल हिला बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यापूर्वी खूप प्रसिद्धी मिळाली आहे. शहनाज गिलने अद्याप बॉलिवूडमध्ये एंट्री घेतलेली नाही, पण तिच्याकडे ऑफर्सची लाईन लागली आहे. अभिनेत्री शहनाज सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये प्रवेश करणार आहे. मात्र त्याआधी तिला आणखी एक मोठा प्रोजेक्ट मिळाला आहे. निर्माते निखिल अडवाणीच्या नव्या चित्रपटात शहनाज गिल दिसणार आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर हा चित्रपट पाच महिलांच्या कथेवर आधारित असेल. यामध्ये शहनाज व्यतिरिक्त वाणी कपूर देखील काम करत आहे. या महिला केंद्रित चित्रपटात प्रत्येक अभिनेत्रीला महत्त्वाची भूमिका दिली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचे शूटिंग गेल्या वर्षी सुरू होणार होते, परंतु हवामानाच्या समस्येमुळे ते होऊ शकले नाही. आता त्याचे शूटिंग मार्च 2023 मध्ये भोपाळमध्ये सुरू होईल.

बातम्यांमध्ये असेही म्हटले जात आहे की शहनाज गिल तिच्या पात्रात येण्यासाठी खूप कष्ट करत आहे. कामात सुधारणा करण्यासाठी तिने अभिनयाचे प्रशिक्षणही घेणे सुरू केले आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी मिताक्षरा कुमार यांच्याकडे आहे. मिताक्षरा सध्या दिग्गज दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या 'हिरा मंडी' या वेबसिरीजमध्ये काम करत आहे. 'बाजीराव मस्तानी' आणि 'पद्मावत' या चित्रपटांदरम्यान त्यांनी भन्साळींना मदत केली आहे. शहनाज गिल निखिल अडवाणी आणि सलमान खान तसेच निर्मात्या रिया कपूरच्या नवीन चित्रपटाचा एक भाग आहे. शहनाज गिलच्या या चित्रपटाचे दिग्दर्शन रिया कपूरचा पती करण बुलानी करणार आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत अनिल कपूर आणि भूमी पेडणेकरही असणार आहेत.

# सईचा फुलमती लूक चर्चेत



हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या एका लूकमुळे चांगलीच चर्चेत आली आहे. सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते. याच फोटोमुळे ती नेहमी चर्चेत असते. नुकतंच सईने एक अतरंगी फोटोशूट केलं आहे. या फोटोंमध्ये सईने फुलमती लूक केला आहे. सईच्या या फोटोवर सईचे चाहते अनेक कमेंट्स करत आहेत.

मराठमोळी अभिनेत्री सई ताम्हणकर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री सई ताम्हणकर सध्या एका लूकमुळे चांगलीच चर्चेत आली आहे.

सई नेहमी सोशल मीडियावर तिच्या वेगवेगळ्या लूकचे फोटो शेअर करत असते.नुकतंच सईने एक अतरंगी फोटोशूट केलं आहे.या फोटोमध्ये सईने फुलमती लूक केला आहे.

# भारताचा इंग्लंडवर मोठा विजय!

## भारताने 7 विकेट्स राखून या सामन्याचा इतिहास घडवला

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।**

**क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच पार पडणाऱ्या अंडर-19 महिला टी-20 विश्वचषकात महिला संघाने भारताचे नाव कोरले आहे. आजच्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडवर मात करत मोठा विजय मिळवला आहे**



शेफाली वर्माच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने गोलंदाजी, क्षेत्ररक्षण आणि फलंदाजीत उत्तम कामगिरी केली. भारताने 7 विकेट्स राखून या सामन्याचा इतिहास घडवला आहे.

नाणेफेक जिंकून भारतीय संघाने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मैदानात फलंदाजी करण्यासाठी उतरलेला इंग्लंड संघ अवघ्या 68 धावांत गुंडाळला गेला. भारताने हे आव्हान सहजरित्या पूर्ण करत इंग्लंडवर दणदणीत विजय मिळवला. शेफालीनेही 7 सामन्यांत 172 धावा केल्या. तर गोलंदाजीत पार्श्वी चोप्राने भारताकडून सर्वाधिक 11 विकेट्स घेतल्या आहेत. तितास संधू, अर्चना देवी आणि पार्श्वी चोप्रा यांनी प्रत्येकी 2 विकेट्स घेतल्या. मन्नत कश्यप, शेफाली वर्मा आणि सोमन सिंग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

भारताने पहिल्याच षटकात इंग्लंडच्या लिबर्टी हिपला शून्यावर बाद केले आणि इंग्लंडला पहिला धक्का दिला. त्यानंतर भारताने भेदक गोलंदाजीचा मारा करत इंग्लंडला अजून धक्के दिले आणि संघाला 68 धावातच गुंडाळलं.

2006मध्ये 19 वर्षांखालील मुलांच्या वर्ल्ड कप फायनलमध्ये पाकिस्तानने 71 धावांवर भारताचा डाव गुंडाळला होता. महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने पहिला ट्वेंटी-20 वर्ल्ड कप जिंकला होता आणि आज शेफाली वर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघाने इतिहास रचला आहे.

### भारतीय महिला संघाने इतिहास रचला

2006मध्ये 19 वर्षांखालील मुलांच्या वर्ल्ड कप फायनलमध्ये पाकिस्तानने 71 धावांवर भारताचा डाव गुंडाळला होता. महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने पहिला ट्वेंटी-20 वर्ल्ड कप जिंकला होता आणि आज शेफाली वर्माच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने गोलंदाजी, क्षेत्ररक्षण आणि फलंदाजीत उत्तम कामगिरी केली. भारताने 7 विकेट्स राखून या सामन्याचा इतिहास घडवला आहे.

# नोव्हाक जोकोविच ठरला ऑस्ट्रेलियन ओपनचा बादशाह

## दहाव्यांदा पटकावले जेतेपद

**।ऑस्ट्रेलिया। महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।**



स्टार खेळाडू सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचने ऑस्ट्रेलिया ओपनमध्ये पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात ग्रीसच्या स्टिफनोस त्सित्सिपासचा पराभव करत ट्रॉफीवर नाव कोरले आहे. जोकोविचने स्टिफनोसला 6-3,7-4 आणि 7-6 च्या सेटमध्ये पराभूत केले. विशेष म्हणजे यासोबत त्याने स्पेनचा स्टार टेनिसपटू राफेल नदालच्या ग्रँडस्लॅमच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. आता जोकोविचकडील ग्रँडस्लॅमची संख्या 22 झाली आहे. तसेच नोवाक जोकोविचचे हे 10वे ऑस्ट्रेलिया ओपनचे जेतेपद असून नदालनेही 10 वेळा ऑस्ट्रेलियन ओपन जिंकली आहे. या विजेतेपदासह जोकोविच जगातील नंबर वन खेळाडू बनला आहे. जोकोविचने 10व्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनची फायनल खेळली. याआधी जोकोविचने नऊ वेळा या ग्रँडस्लॅम स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे आणि प्रत्येक वेळी विजेतेपद पटकावले आहे.

जोकोविचने पहिला सेट 6-3 असा सहज जिंकला. यानंतर सर्बियन स्टार नोवाकला दुसरा आणि तिसरा सेट जिंकण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागली. हे दोन्ही सेट टायब्रेकरमध्ये गेले, जोकोविचने दुसरा सेट 7(7)-6(4) ने जिंकला. त्यानंतर तिसरा सेट 7(7)-6(5) ने जिंकला. पुरुष एकेरीची सर्वाधिक ग्रँडस्लॅम जिंकणारे पुरुष खेळाडू

22- नोव्हाक जोकोविच
22- राफेल नदाल
20- रॉजर फेडरर

### मागील वर्षी मुकला होता ऑस्ट्रेलिया ओपनला

2021 मध्ये नोवाकनं ऑस्ट्रेलिया ओपनचं जेतेपद पटकावलं होतं. पण कोविड प्रोटोकॉलमुळे 2022 च्या सीझनमध्ये तो खेळू शकला नाही. स्पर्धेच्या आयोजकांनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लसीकरण अनिवार्य केलं होते, तर नोव्हाकला लसीकरणासंबंधीची माहिती सार्वजनिक करायची नव्हती. त्यामुळे तो 2022 मध्ये ऑस्ट्रेलिया ओपन खेळू शकला नव्हता. तसंच आजच्या सामन्याबद्दल बोलायचं झाल्यास, चौथ्या मानांकित नोवाकनं ग्रीसच्या त्सित्सिपासचा सरळ सेटमध्ये पराभव केला.

# भारताची न्यूझीलंडवर ६ गडी राखून मात

## हुश्श! अवघा एक चेंडू अन् सहा गडी मालिकेत 1-1 अशी साधली बरोबरी

**।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारत आणि न्यूझीलंड संघातील दुसरा टी-२० सामना लखनऊमध्ये खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडवर ६ गडी राखून मात केली. त्याचबरोबर तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. भारताकडून कर्णधार हार्दिक पांड्या १५ आणि उपकर्णधार सूर्यकुमार यादव २६ धावांवार नाबाद राहिले.

न्यूझीलंड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना, निर्धारित २० षटकांत ८ बाद ९९ धावा केल्या होत्या. त्यामुळे भारतीय संघाला विजयासाठी १०० धावांचे लक्ष्य मिळाले. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाने १९.५ षटकांत ४ गडी गमावून १०१ धावा करत विजय मिळवला. न्यूझीलंड संघाकडून कर्णधार मिचेल सँटनरने सर्वाधिक धावांचे योगदान दिले. त्याने २३ चेंडूत नाबाद १९ धावा केल्या. इतर किवी फलंदाज भारतीय गोलंदाजांपुढे सपशेल अपयशी ठरले. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना अर्शदीप सिंगने सर्वाधिक २ विकेट घेतल्या. त्याचबरोबर शिवम मावी वगळता प्रत्येक गोलंदाजांने प्रत्येकी १ विकेट घेतली. १०० धावांचा पाठलाग करायला उतरलेल्या भारतीय संघाला शुबमन गिलच्या रुपाने पहिला धक्का बसला. शुबमन गिल ११(९) धावा करुन झेलबाद झाला.

